दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४१० वा ● शनिवार, ता.२० सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# निवडणूक आयोगाची कारवाई आणखी ४७४ पक्ष वगळले

## ३५९ पक्षांवर गडांतर; महाराष्ट्रातील ४४ पक्षांचा समावेश

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारताच्या निवडणूक आयोगाने (ECI) निवडणूक प्रणाली स्वच्छ करण्याच्या मोहिमेला गती देत पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. आयोगाने १८ सप्टेंबर २०२५ रोजी एकूण ४७४ नोंदणीकृत अप्रमाणित राजकीय पक्षांना (RUPPs) यादीतून वगळले.

तसेच आणखी ३५९ पक्षांवर वगळण्याची कार्यवाही सुरू केली असल्याचेही स्पष्ट केले. आयोगाच्या माहितीनुसार, हे सर्व पक्ष सलग सहा वर्षांपासून एकही निवडणूक लढविण्यात अपयशी ठरले होते. कायद्यानुसार (Representation of People Act १९५१, कलम २९A), अशा पक्षांना मिळणारी चिन्ह, करसवलत यांसारखी




विशेषाधिकाराची पात्रता रद्द होते. दोन महिन्यांतील मोठी मोहिम पहिल्या टप्प्यात (९ ऑगस्ट २०२५ रोजी) ३३४ पक्ष वगळले तर दुसऱ्या टप्प्यात (१८ सप्टेंबर २०२५ रोजी) आणखी ४७४ पक्ष वगळले. यामुळे अवघ्या दोन महिन्यांत एकूण ८०८ पक्षांना यादीतून वगळण्यात आले आहे. तिसरा टप्पा सुरू २३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील ३५९ पक्षांनी २०२१-२२,२३,२४ या सलग तीन आर्थिक वर्षांचे वार्षिक लेखापरीक्षित हिशेब न सादर केल्यामुळे त्यांच्यावरील वगळण्याची कार्यवाही सुरू आहे.

संबंधित पक्षांना स्पष्टीकरणासाठी कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. उत्तर प्रदेश (१२१), महाराष्ट्र (४४), तामिळनाडू (४२), दिल्ली (४०) आणि आंध्र प्रदेश (१७) या राज्यांतील मोठ्या प्रमाणावर पक्ष वगळले गेले आहेत. निवडणूक आयोगाचा हा निर्णय निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकता आणि शुचिता राखण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.



## न्यायमूर्ती एस.पी. तावडे यांचा छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते गौरव

**कोल्हापूर । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.पी. तावडे यांना महाराष्ट्र शासनाकडून Bharatratna Dr. Babasaheb Ambedkar Award for Excellence and Social Engineering हा बहुमान मिळाल्याबद्दल कोल्हापूर डिस्ट्रिक्ट कंझ्युमर कोर्ट बार असोसिएशनतर्फे त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम पार पडला.

सोहळ्यात खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते जोतिबांची प्रतिमा देऊन न्यायमूर्ती तावडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य ग्राहक आयोगाचे सदस्य विजय प्रेमचंदानी, कोल्हापूर आयोगाचे अध्यक्ष प्रवीण खोत, कंझ्युमर बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप जाधव, सचिव राजेंद्र वायंगणकर यांच्यासह पाच जिल्ह्यांतील वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. न्यायमूर्ती तावडे यांचा हा गौरव कोल्हापूर जिल्हा ग्राहक न्यायव्यवस्थेसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.




## ना.धों. महानोर जयंतीनिमित्त बहिणाबाईंच्या कवितांची सुरेल मैफील

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

येथील यशवंतराव चव्हाण सेंटर, भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशन आणि परिवर्तन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य ना. धों. महानोर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी ता.१६ सप्टेंबर रोजी बहिणाबाईंच्या अजरामर कवितांचा सुरेल सांगितीक कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, ज्येष्ठ सिने दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, डॉ. श्यामकांत देवरे, नारायण बाविस्कर आणि राजश्री शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बहिणाबाईंच्या शेतीशी नातं सांगणाऱ्या कवितांनी झाली. 'माझी माय सरस्वती', 'खोप्यामधी खोपा', 'धरतीच्या कुशीमंदी' यांसह ना. धों. महानोर यांच्या कवितांचेही सादरीकरण करण्यात आले. शंभू पाटील यांच्या अभ्यासपूर्ण निवेदनामुळे कार्यक्रमाला साहित्यिक उंची लाभली. यावेळी शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, तर सूत्रसंचालन हर्षल पाटील यांनी केले. काव्य आणि संगीताचा संगम अनुभवण्यासाठी काव्यप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

## पतसंस्थांद्वारेही मराठा समाजासाठी जातीनिहाय जनगणना जागृती

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

येत्या २२ तारखेपासून सुरू होणाऱ्या जातीनिहाय जनगणनेसंदर्भात मराठा समाजातील नेते मंडळीकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. त्या अनुषंगाने मराठा समाजाचे युवा नेते किरण जाधव यांनी आज बेळगावमधील नामांकित नवहिंद को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि मराठा सहकारी बँकेला भेट देऊन जातीनिहाय जनगणना पत्रकात मराठा समाजाने माहिती कशी नोंदवावी याबाबत मार्गदर्शन केले.



यावेळी मराठा बँकेचे चेअरमन दिगंबर पवार यांनी संचालकांसमवेत माहिती घेऊन बँकेच्या सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांना आवाहन केले की, मराठा समाजातील नागरिकांनी जातीनिहाय जनगणना पत्रकात आपली माहिती योग्य प्रकारे नमूद करावी. त्यांनी नमूद केले की धर्म हिंदू, जात मराठा, पोटजात कुणबी आणि भाषा मराठी असे लिहावे. बँकेच्या संचालिका रेणू किल्लेकर यांनीही नागरिकांना मार्गदर्शन करत सांगितले की, जातीनिहाय जनगणनेसाठी आलेल्या अधिकाऱ्यांसमोर मराठा समाजाच्या नेत्यांनी दिलेल्या सूचनांनुसार माहिती भरावी. नवहिंद को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन प्रदीप अष्टेकर यांनी स्पष्ट केले की, धर्म हिंदू, जात मराठा, पोटजात कुणबी व मातृभाषा मराठी असे ठोसपणे नमूद करणे आवश्यक आहे, जेणेकरून पुढील पिढीला याचा लाभ मिळेल. किरण जाधव हे विविध संघ-संस्थांना भेट देत त्यांचे पदाधिकारी व संचालक मंडळांना जातीनिहाय जनगणनेसाठी भरावयाच्या माहितीविषयी सखोल मार्गदर्शन करत आहेत.

## अंगणवाडी सेविकेचे शौर्य तरुणाला धरून घराकडे नेले फरपटत

### गावकऱ्यांनी दिले पोलिसांच्या ताब्यात

**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील पूर्व भागातील एका गावात घडलेल्या चित्तथरारक घटनेने संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय ठरला. दुपारच्या वेळी सुनसान रस्त्यावरून घरी जाणाऱ्या अंगणवाडी सेविकेला दोन तरुणांनी दुचाकीवरून येत गाडीवर बसण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रसंगावधान राखत आणि अपार धैर्य दाखवत सेविकेने त्यातील एकाचा मोबाईल हिसकावून घेत त्याला अक्षरशः घराकडे फरपटत नेले. यावेळी दुसरा साथीदार घाबरून पळून गेला. घटनेची सविस्तर माहिती अशी की, अंगणवाडी सेविका घराकडे जात असताना दोन संशयित तरुणांनी तिला गाडीवर बसण्याचा आग्रह धरला. सुरुवातीला ठाम नकार दिल्यानंतरही ते परतले आणि पुन्हा तिला गाडीवर बसण्याची विनंती करू लागले. यानंतर सेविकेने प्रसंगावधान राखत दुर्गारूप धारण केले. तिने मागे बसलेल्या तरुणाचा मोबाईल हिसकावून घेतला आणि त्याला घट्ट पकडून घराच्या दिशेने ओढत नेले. हे पाहून पुढे बसलेला दुसरा साथीदार गाडी घेऊन फरार झाला. आरडाओरडा ऐकून परिसरातील नागरिक धावून आले आणि त्यांनी धाडसी सेविकेच्या मदतीला जात पकडलेल्या तरुणाला चोप देत पोलिसांच्या हवाली केले. या प्रकाराची माहिती सेविकेने स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्यानंतर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. एकटी असूनही दाखवलेल्या धैर्यामुळे या सेविकेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या धाडसी सेविकेच्या शौर्यामुळे पुन्हा एकदा हे अधोरेखित झाले की, संकटाच्या काळात महिलाही सक्षमपणे लढा देऊ शकतात. फक्त त्यांना समाजाने सकारात्मक पाठबळ द्यावे.

> **112**
> **महिलांनी संकटाच्या वेळी घाबरून न जाता धैर्य दाखवावे आणि 112 या आपत्कालीन क्रमांकावर मदत मागावी.**
> **- संध्या मेढे, ऊर्जिता फौंडेशन**

ऊर्जिता फौंडेशनच्या संध्या मेढे यांनी महिला संरक्षणासंदर्भात माहिती देताना सांगितले, भारत सरकारने सुरू केलेला ११२ हा राष्ट्रीय संकटकालीन हेल्पलाईन क्रमांक आहे. यास All-in-One Emergency Helpline असेही म्हणतात. या क्रमांकावर फोन केल्यावर पोलिस, अग्निशामक दल, रुग्णवाहिका (ॲम्ब्युलन्स) आणि इतर तात्काळ मदत सेवा मिळते. कोणत्याही मोबाईल किंवा लँडलाईनवरून यावर कॉल करता येतो. ही सेवा देशभरात कुठेही, कधीही उपलब्ध आहे. याचे 112 India नावाचे अधिकृत ॲप गुगल प्ले स्टोअर / ॲप स्टोअरवर उपलब्ध असून, SOS बटण दाबून त्वरित मदत मागवता येते. कॉल करताच आपले लोकेशन नियंत्रण कक्षात (Control Room) पोहोचते, त्यामुळे मदत लवकर पोहोचते. मोबाईल किंवा लँडलाईनवरून थेट ११२ डायल करा. ॲप वापरत असाल तर बटण दाबा. स्मार्टफोनमध्ये पॉवर SOS बटण ३ वेळा दाबल्यास देखील SOS अलर्ट जातो.अनेक मोबाईलमध्ये ही सुविधा आहे. म्हणून कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी फक्त ११२ हा क्रमांक डायल करावा.

## देवाभाऊ हे वादग्रस्त पोस्टर हटविण्यास सुरुवात

**पिंपरी चिंचवड । रयत समाचार**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानासाठी उभारलेल्या आंदोलकांना अखेर यश मिळाले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागांमधील देवाभाऊ हे वादग्रस्त पोस्टर हटविण्याची कारवाई सुरू झाली आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या शिवप्रेमी बांधवांनी महानगरपालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांना जाब विचारत नैतिक दबाव आणला होता. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते. शिवाजी महाराजांच्या अपमानास कारणीभूत ठरणारे कोणतेही पोस्टर शहरात सहन केले जाणार नाही, असा ठाम इशारा देण्यात आला होता. अखेर प्रशासनाने कारवाई सुरू



केल्याने शिवप्रेमींमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शहरातील नागरिकांनी या कृतीचे स्वागत केले असून ''शिवरायांचा सन्मान हा सर्वांच्या श्रद्धेचा विषय आहे,'' असे मत व्यक्त केले जात आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या यशस्वी आंदोलनाबद्दल सर्व शिवप्रेमींनी अभिनंदन व्यक्त केले आहे.

## महापालिकेच्या सौजन्याने भटक्या कुत्र्यांचा उच्छाद?



**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे मागील बऱ्याच दिवसापासून भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली असून नागरिकांना घराच्या बाहेर पडणे धोकादायक ठरत आहे. मागील काही दिवसात या भटक्या कुत्र्यांनी परिसरातील शेतकऱ्यांच्या शेळ्या व वासरांवर हल्ला करून चावा घेतला आहे. पिंपळगाव माळवीतील पंपिंग स्टेशन येथे

> **माझ्याकडे दुग्ध उत्पादनासाठी गाई आहेत. मागच्या आठवड्यात या भटक्या कुत्र्यांनी आमच्या कालवडींवर हल्ला केला. सर्व कालवडींना अँटी रेबीज इंजेक्शन दिले.**
> मच्छिंद्र झिने (शेतकरी)

अहिल्यानगर महानगरपालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र आहे. शहरातील भटके कुत्रे येथे आणून सोडतात व त्यातील बरेचसे कुत्रे गावामध्ये आले आहेत. हे कुत्रे टोळीने शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांवर हल्ला करतात. रस्त्याने जाणाऱ्या विद्यार्थी, पादचारी, वाहन चालक यांचा पाठलाग केल्यामुळे बऱ्याच वेळा अपघात घडले आहेत. बनकर वस्ती येथील शेतकऱ्यांच्या शेळ्या या कुत्र्यांनी फस्त केल्या. तरी या कुत्र्यांचा प्रशासनाने बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी ग्रामसभेत केली आहे.




## डॉ. हेडगेवार नाटकाचा ४९,९३,८३७ खर्च महाराष्ट्राच्या बोकांडी

### लोकनिधीतून संघप्रचाराचे नाटक चालू

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाने युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार या नाटकाच्या आयोजन खर्चास अखेर वित्तीय मान्यता दिली. राज्यातील सहा महसूल विभागांमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने या नाटकाचे प्रयोग आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी रु. ४९,९३,८३७/- (अक्षरी एकोणपन्नास लक्ष त्र्यान्नव हजार आठशे सदतीस रुपये फक्त) इतका खर्च शासनाने मंजूर केला. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या १९ सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार ही रक्कम २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ''कला व संस्कृती प्रचालन'' या लेखाशिर्षाखालील तरतुदीतून भागवण्यात येणार आहे. या खर्चाच्या कार्यवाहीसाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक यांना नियंत्रण अधिकारी, तर लेखाधिकारी यांना आहरण व संवित्तरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच कार्यक्रमानंतर एक महिन्याच्या आत सविस्तर उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक आहे. हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीनंतर आणि संबंधित परिपत्रकांतील अटींच्या अधीन राहून देण्यात आला असून, तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या निर्णयामुळे राज्यभर सादर झालेल्या या संघप्रचाराच्या नाटकाचा आयोजन खर्च महाराष्ट्राच्या बोकांडी टाकून राज्यशासन मोकळे झाल्याची जनतेत चर्चा आहे.

## राहुल कुलकर्णी 'मराठवाडा भूषण २०२५' पुरस्काराने सन्मानित

**पुणे । रयत समाचार**

मराठवाडा समन्वय समिती, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा 'मराठवाडा भूषण २०२५' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा पत्रकार राहुल कुलकर्णी यांना प्रदान करून गौरविण्यात आले. मराठवाडा मुक्तिदिनानिमित्त ता. १७ सप्टेंबर रोजी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत मराठवाड्याच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक योगदानाचा गौरव करण्यात आला. पुरस्कारप्राप्त राहुल



कुलकर्णी यांच्या कार्याची माहिती देताना समितीकडून सांगण्यात आले की, हा पुरस्कार म्हणजे मराठवाड्याच्या वैभवशाली परंपरेचा सन्मान असून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठवाडा समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांसह पुण्यातील विविध मान्यवरांनी परिश्रम घेतले. पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी या सन्मानाबद्दल समितीचे तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



## लैंगिक समानतेच्या मिशनसाठी समर्पित होण्याचे रहाटकर यांचे आवाहन

**पटना । रयत समाचार**

अधिवेशन भवन, पटना येथे बिहार राज्य महिला आयोगाच्या २४ व्या स्थापना दिनानिमित्त महिला जागृती संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री नितीशकुमार, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजयकुमार सिन्हा, तसेच बिहार महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती अप्सरा उपस्थित होत्या, अशी माहिती विजया रहाटकर यांनी दिली. यावेळी विजय रहाटकर सांगितले की, बिहार राज्य महिला आयोगाचा स्थापना दिन हा केवळ एका संस्थेच्या प्रवासाचा टप्पा नाही, तर महिलांच्या अधिकार व सन्मान रक्षणासाठी राज्याची असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा दिवस आहे. कार्यक्रमात बिहार राज्य महिला आयोगाच्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून राज्यातील महिला आपली समस्या व तक्रारी आता ऑनलाइन नोंदवू शकतील. रहाटकर पुढे म्हणाल्या, बिहार राज्य महिला आयोगाने महिलांना हिंसा, भेदभाव व असमानतेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी व्यासपीठ दिले आहे. तक्रारींची सुनावणी, जनजागृती मोहिमा, कायदेशीर मदत आणि समुपदेशन अशा सर्व उपक्रमांतून आयोगाने महिलांसाठी सुरक्षित व सहायक वातावरण निर्मितीचे महत्त्वाचे कार्य केले आहे. स्थापना दिनानिमित्त त्यांनी पुन्हा एकदा लैंगिक समानतेच्या मिशनसाठी समर्पित होण्याचे आवाहन करण्यात आले.

# भूमिहीनांना विनामोबदला जमीन मिळावी, शासकीय जमिनी नियमाकुल कराव्यात

## बसपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दलित-आदिवासी समाज भूमिहीनच

**अहमदनगर । रयत समाचार**

बहुजन समाज पार्टीच्या (बसपा) वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिलेल्या निवेदनाद्वारे भूमिहीन कुटुंबांना उपजीविकेसाठी विनामोबदला जमीन वाटप करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शेती करणाऱ्या भूमिहीन कुटुंबांच्या नावावर ती जमीन कायमस्वरूपी करण्याचेही आवाहन करण्यात आले. या निवेदनावेळी बसपाचे जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, महासचिव राजू शिंदे, सलीम अत्तार, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाले, उमाशंकर यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बसपाच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटूनही दलित व आदिवासी समाजातील मोठा वर्ग अद्याप भूमिहीन आहे. हजारो वर्षे समाजातील कठीण, अशुद्ध व कष्टाची कामे पार पाडणारा हा समाज आजही उपेक्षित आहे. डोक्यावर मैला वाहून नेणे, मेलेली जनावरे उचलणे, शेतीची अवजारे



### १३ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचा इशारा

तयार करणे, सफाईकामे करणे अशी समाजसेवा करणाऱ्या या घटकांचा आजही शासकीय जमिनीवर हक्क होत नाही, असे नमूद करण्यात आले. उसतोडीच्या कामगारांपैकी ९० ते ९५ टक्के कामगार दलित-आदिवासी समाजातील असून त्यांचे आर्थिक शोषण सुरूच आहे. त्यांनी ज्या जमिनीवर घरे उभी केली आहेत त्या मालकीच्या नोंदी त्यांच्या नावावर होत नाहीत. अनेक भागात दफनभूमीचीही सोय उपलब्ध नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मराठा आरक्षण आंदोलनातील गुन्हे शासनाने मागे घेतले, त्याच धर्तीवर भीमा कोरेगाव दंगलीनंतर शांततेने निदर्शन करणाऱ्या समाजबांधवांवर दाखल झालेले खोटे गुन्हेही मागे घ्यावेत.

पारंपरिकरित्या मासेमारी करून उपजीविका करणाऱ्या आदिवासी समाजाला सरकारी जलाशयातील मासेमारीचे ठेके थेट देण्याची मागणीही करण्यात आली आहे. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमाकुल करून भूमिहीनांच्या नावावर करावीत.भूमिहीन कुटुंबांना प्रत्येकी मोफत पाच एकर जमीन द्यावी.भीमा कोरेगाव दंगलीनंतर आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेले खोटे गुन्हे मागे घ्यावेत. सरकारी जलाशयातील मासेमारीचे ठेके थेट आदिवासी समाजाला द्यावेत. या प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास येत्या १३ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा इशाराही बसपाच्या वतीने देण्यात आला आहे.

---

## नगरचा मान उंचावला!

# ऑल इंडिया हायकोर्ट एम्प्लॉईज फेडरेशन मुख्य खजिनदारपदी राजेंद्र खिलारी बिनविरोध

**अहमदनगर । विजय मते**

देशपातळीवरील प्रतिष्ठेच्या ऑल इंडिया हायकोर्ट एम्प्लॉईज फेडरेशनच्या निवडणुकीत नगरचा मान उंचावणारी घटना घडली आहे. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलेले नगरचे सुपुत्र राजेंद्र एकनाथ खिलारी यांची मुख्य खजिनदारपदी बिनविरोध निवड झाली आहे. पाटणा (बिहार) येथे नुकत्याच पार पडलेल्या विशेष अधिवेशनात देशभरातील उच्च न्यायालयांतील प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही निवडणूक झाली. मध्यप्रदेश हायकोर्टचे निवडणूक अधिकारी पुष्पेंद्र जैन यांच्या हस्ते खिलारी यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. कनोली (ता. संगमनेर) या ग्रामीण भागातील सुपुत्र असलेल्या खिलारी यांनी नगरमध्ये स्थायिक होऊन आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. १९९२ ते २००५ या काळात त्यांनी न्यू आर्ट्स,



कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नगर येथे लेखा विभागात सेवा दिली. त्यानंतर न्यायालयीन सेवेत दाखल होत आज ते राजपत्रित अधिकारी पदावर कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मुंबई उच्च न्यायालय कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष, कर्मचारी मेडिकल वेलफेअर ट्रस्टचे मानद सचिव तसेच उच्च न्यायालय कर्मचारी पतसंस्थेचे संचालक या नात्याने त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. विशेष म्हणजे विविध शाखांमध्ये प्राप्त केलेल्या नऊ पदव्यांच्या जोरावर त्यांची २०१९ मध्ये इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली. ''देशातील सर्वाधिक शैक्षणिक पात्रता प्राप्त कक्ष अधिकारी'' हा किताब त्यांना मिळाला असून न्यायालयीन कर्मचारी वर्गासाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. खिलारी यांच्या या निवडीबद्दल आ. संग्राम जगताप, नगरसेवक सुनील त्र्यंबके, निखिल वारे, बाळासाहेब पवार, विनीत पाउलबुधे आदींनी अभिनंदन केले. तसेच न्यू आर्ट्स कॉलेजचे सेवकवृंद, छत्रपती ट्रस्ट, लक्ष्मीनगरमधील रहिवासी, १९९७ बी.कॉम बॅचचे मित्रपरिवार यांनीही मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

---

# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त ७५ बिल्ववृक्षांची लागवड

## जागतिक पर्यावरण विकास सरकारचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त जागतिक पर्यावरण विकास सरकार, अहिल्यानगरच्या वतीने शहर परिसरात ७५ बिल्ववृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला पर्यावरणप्रेमींसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रसंगी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरक्षनाथ गवते, प्रकाश बागल, महेश मंडलिक, भाऊसाहेब मोरे, पोपटराव पठारे, निलेश साठे, नवनाथ गवते, नानासाहेब जिवरग आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर सर्वांनी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून देत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

गोरक्षनाथ गवते म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन अत्यावश्यक आहे. शासन प्रयत्नशील असले तरी नागरिकांनीही सामाजिक




जबाबदारीची जाणीव ठेवून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याची काळजी घ्यावी.

''आजच्या काळात पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी झाली आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. बिल्ववृक्षाचे धार्मिक, औषधी आणि पर्यावरणीय असे तिन्ही महत्त्व असल्याचे गवते यांनी नमूद केले. ऑक्सिजन निर्मिती व प्रदूषण शोषणासाठी या वृक्षाचा मोठा उपयोग होतो, त्यामुळे यावर्षी संस्थेने विशेषतः बिल्ववृक्ष लागवडीवर भर दिला आहे. संस्था २०११ पासून एक झाड एक विद्यार्थी, कुऱ्हाड बंदी, हुंडाबंदी, व्यसनमुक्ती, डीजे बंदी यांसारखे विविध पर्यावरण व समाजरक्षणाचे उपक्रम सातत्याने राबवत आहे. वृक्षारोपणानंतर ''झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा'' अशा घोषणांनी जनजागृती करण्यात आली.

---

# नागरी सुविधांचा बोजवारा; प्रशासक डांगे यांना भाजपाने घेराव घालत विचारला जाब



**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील कचरा, घाणीचे साम्राज्य, भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास आणि बाजारपेठांतील वाढते अतिक्रमणे या नागरी समस्यांवर भाजप पदाधिकारी व माजी नगरसेवकांनी गुरुवारी प्रशासक यशवंत डांगे यांना घेराव घातला. यावेळी आक्रमक झालेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना चांगलेच धारेवर धरले. शहरातील कचरा उचलला जात नसल्याने ठीकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी व रोगराई पसरत आहेत. यावर तातडीने उपाययोजना न केल्यास आयुक्तांच्या कार्यालयात कचरा आणून टाकण्याचा इशारा भाजपचे जिल्हा सरचिटणीस निखील वारे व माजी नगरसेवक धनंजय जाधव यांनी दिला. संगीता खरमाळे यांनी भटक्या कुत्र्यांचा प्रश्न उपस्थित करून त्यावर मार्ग काढण्याची मागणी केली. लवकरच नवरात्र, दसरा व पाठोपाठ दिवाळी सण येत असल्याने शहरातील सर्व बाजारपेठ्या अतिक्रमण मुक्त करा, अशी मागणीही यावेळी पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी प्रशासक डांगे यांनी कचरा संकलनाच्या निविदा पुन्हा नव्याने काढाव्या लागणार आहे. ती प्रक्रिया होत असून शहरात कचरा उचलण्यासाठी ५५ गाड्या व १७ ट्रॅक्टरची व्यवस्था करण्यात आली आहे, असे सांगून श्वान निर्बीजीकरणाचे कामही हाती घेण्यात आले असल्याचे सांगितले. यावेळी शहर भाजपचे अजय चितळे, नीरज राठोड, मयूर ताठे, सोमनाथ जाधव, करण कराळे, अमोल निस्ताने, बाळासाहेब भुजबळ, गोपाल वर्मा, शिरीष जानवे, महेश गुगळे, चंदन बारटक्के, विजय गायकवाड, अजित कोतकर, बाबासाहेब सानप, महेश तवले, रामदास आंधळे, अजित बोरुडे, पुष्कर तांबोळी, संपत नलावडे, मनोज दुल्लम, बंटी डापसे, महेश नामदे, विशाल खैरे, पल्लवी जाधव, अर्चना बनकर व दत्ता गाडळकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

---

# शहरातील मुस्लिम महिलांचा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा

## पैगंबर मोहम्मदाबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्यावर तात्काळ अटक करण्याची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.व.) यांच्याबाबत अपशब्द व आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या निषेधार्थ शहरातील मुस्लिम महिलांनी शुक्रवारी (दि. १९ सप्टेंबर) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोठा मोर्चा काढला. भर पावसात सुरू झालेल्या या मोर्चात शहरातील महिला व युवती मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. मोर्चात महिलांनी राजेंद्र भंडारी या व्यक्तीवर तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.


कोठला येथून मोर्चाला सुरुवात करण्यात आली आणि महिलांनी ''आय लव्ह मोहम्मद'' असा बॅनर झळकवत जोरदार घोषणाबाजी केली. निवेदनात म्हटले आहे की, राजेंद्र भंडारी नावाच्या व्यक्तीने सोशल मीडियाच्या माध्यमातून इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.व.) यांच्याबाबत अपशब्द वापरले, तसेच मुस्लिम महिलांबद्दल अपमानास्पद शब्द वापरून समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. या वक्तव्यामुळे संपूर्ण मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना अपमानित झाल्या असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सदरील प्रकरण गंभीर असून शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. महिला व समाजकंटकांच्या वतीने प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेऊन आरोपीवर कारवाई करावी, असा इशारा मोर्चातून दिला गेला. महिलांनी म्हटले की, जर त्वरीत कारवाई झाली नाही, तर समस्त मुस्लिम महिला समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# कृष्णाली फाउंडेशनतर्फे जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण

## फळझाडांचे वाटप, देवराई उभारणीसाठी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहमदनगर । रयत समाचार**

पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत कृष्णाली फाउंडेशनच्या वतीने जामखेड तालुक्यातील पिंपळगाव आळवा व घोडेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये वृक्षारोपण सोहळा संपन्न झाला. रिमझिम पावसाच्या साक्षीने झालेल्या या कार्यक्रमात शालेय परिसरात विविध प्रकारची झाडे लावून विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना फळझाडांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम अभिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून कार्यरत असलेल्या सह्याद्री देवराईचे मॅनेजिंग डायरेक्टर सचिन चंदने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी सह्याद्री देवराई फाउंडेशनचे योगेश पंधेरे, सीआरएचपी जामखेडचे डॉ. जयेश कांबळे, सेवानिवृत्त वन अधिकारी घायतडक, महाराष्ट्र शासनाचे शास्त्रज्ञ डॉ. रणजीत राऊत, कृष्णाली फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियांका पाटील शेळके, खजिनदार अमर बोबडे, सह खजिनदार शिवाजी उबाळे, ग्रामपंचायत सदस्य बबनभाऊ बोबडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. सावता बोराटे, उपाध्यक्ष निळकंठ खवळे, अफसर शेख, किरण खवळे, विनोद बारवकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी सचिन चंदने यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीचे महत्त्व, संगोपन आणि पर्यावरण संतुलनाची आवश्यकता पटवून दिली. तसेच सह्याद्री देवराईच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. जयेश कांबळे यांनी जामखेड परिसरात लोकसहभागातून वृक्ष लागवडीची व्यापक चळवळ उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे स्वागत मुख्याध्यापक अशोक घोडेस्वार यांनी केले, प्रास्ताविक प्रियांका पाटील शेळके यांनी तर सूत्रसंचालन पवार सर यांनी केले. आभार डॉ. जयेश कांबळे यांनी मानले. कृष्णाली फाउंडेशनने यापूर्वीही शालेय साहित्य वाटप, नव्या प्रवेशित विद्यार्थ्यांचा सत्कार यांसारखे शैक्षणिक उपक्रम राबवून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आगामी काळात जामखेड तालुक्यात भव्य देवराई उभारण्याचा मानस असून, यासाठी सह्याद्री देवराई फाउंडेशन व कृष्णाली फाउंडेशन संयुक्तपणे कार्यरत राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यासाठी झालेल्या प्राथमिक बैठकीत ग्रामस्थ व सरपंच शरद जगताप यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# मुसळधार पावसाने बंधारे फुटले; पिकांचे व विहिरींचे मोठे नुकसान

**जामखेड । रिजवान शेख**

गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जामखेड तालुक्यासह परिसरातील नदी-नाल्यांना पूर आला आहे. या पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. विशेषतः सीना नदीकाठच्या गावांना आणि वस्त्यांना याचा फटका बसला असून ऊस, मका, सोयाबीन यांसारखी अनेक पिके पाण्याखाली गेली आहेत. जवळा, आगी, खडकत येथील बंधारे फुटल्याने लगतच्या जमिनी पिकांसकट वाहून गेल्या आहेत. पाण्याचा प्रचंड लोट येताच जवळा, चौंडी, आगी, अळजापूर परिसरातील काही बंधारे कोसळले. अचानक आलेल्या पाण्याच्या लाटेमुळे शेतजमिनी पाण्याखाली जाताच उभी पिके वाहून गेली असून जमिनीची सुपीक मातीही मोठ्या प्रमाणावर नष्ट झाली आहे. फुटलेल्या बंधाऱ्यांमुळे सिंचनासाठी टाकण्यात आलेली माती पाइपलाइन वाहून गेली असून सिंचन व्यवस्थेची हानी झाली. काही ठिकाणी विहिरींना पाणी व मातीचा जोरदार धक्का बसल्याने त्या कोसळल्या किंवा चिखलाने भरल्या आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान प्रचंड झाले असून अनेकांनी पीक काढण्याची संधीही गमवाली. स्थानिक प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन पथके यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा सुरू केला आहे. तहसीलदारांनी सांगितले की प्राथमिक अंदाजानुसार लाखो रुपयांच्या घरातील पिकांचे व संपत्तीचे नुकसान झाले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून राज्य शासनाला तातडीचा अहवाल पाठवण्यात आला असून शेतकऱ्यांना तत्काळ मदत मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांनी नदी, नाले व पाण्याच्या प्रवाहाजवळ जाणे टाळावे तसेच सुरक्षित ठिकाणी राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



**आमच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. जमिनी पिकांसकट वाहून गेल्या आहेत. सरकारने लवकरात लवकर पूर्ण भरपाई द्यावी,' अशी मागणी शेतकरी दादा प्रभाकर वाळुंजकर यांनी केली.**

# पब्लिक स्कूल वाळुंजच्या विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

## तालुकास्तरीय स्पर्धेत सेजल सातपुते प्रथम, ईश्वरी शिंदे तृतीय

**अहमदनगर । रयत समाचार**

नगर तालुक्यातील बुद्धिबळ स्पर्धेत सबाजीराव गायकवाड कृषी विकास प्रतिष्ठान संचलित पब्लिक स्कूल, वाळुंजच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट यश मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे. ही स्पर्धा नुकतीच ऑर्किड इंटरनॅशनल स्कूल, धनगरवाडी येथे मोठ्या उत्साहात पार पडली. नगर तालुक्यातील अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला होता. यामध्ये इयत्ता १० वीतील विद्यार्थिनी सेजल सातपुते हिने प्रथम क्रमांक मिळवला, तर इयत्ता ८ वीची ईश्वरी शिंदे हिने तृतीय क्रमांक पटकावला. दोन्ही विद्यार्थिनींची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. विद्यार्थिनींना या यशासाठी खुडे सरांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्या तसेच सर्व शिक्षक व पालकांनी दोन्ही विजयी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# कृष्णा घोलप यांची राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कारासाठी निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील युवा कवी व लेखक कृष्णा घोलप यांची आळंदी येथील शिव प्रतिष्ठान संस्थेकडून महाराष्ट्र राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कृष्णा घोलप यांनी साहित्य प्रवासाची सुरुवात अत्यंत लहान वयात केली. सहावीत असताना त्यांनी आपल्या पेडगाव येथील भूईकोट किल्ल्यावर एक अहवाल लिहिला होता. पुढे त्याच अहवालाचे सखोल अभ्यास व संशोधनातून पुस्तकात रुपांतर करण्यात आले.



बारावीत असताना त्यांनी हा अभ्यास पूर्ण केला आणि पदवी शिक्षणादरम्यान 'शौर्यतीर्थ' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकामुळे पेडगावचा दुर्लक्षित किल्ला हजारो घरांपर्यंत पोहोचला आणि कृष्णाच्या साहित्यिक प्रवासाला सुरुवात झाली. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातून आलेल्या कृष्णाने नुकतेच इंग्रजी साहित्यात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. घरची आर्थिक परिस्थिती मर्यादित असूनही केवळ आवड, जिद्द आणि अथक प्रयत्नांच्या जोरावर त्यांनी मराठी साहित्य क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या नावावर प्रकाशित ग्रंथांमध्ये 'शौर्यतीर्थ', 'भरारी', Two Saints One Thought यांचा समावेश आहे. तर 'दलित साहित्याचं पहिलं पान', 'चार लोकं काय म्हणतील?', 'मी राजा बळी', 'हिंदोळा' ही आगामी पुस्तके लवकरच वाचकांसमोर येणार आहेत. विशेष म्हणजे, Two Saints One Thought या इंग्रजी ग्रंथाचे कौतुक युरोपपर्यंत झाले आहे. घोलप यांची एक काव्यरचना सध्या श्रीगोंद्याच्या महामानव बाबा आमटे संस्थेचे संस्थागीत म्हणून स्वीकारण्यात आली आहे. पेडगावच्या या युवा साहित्यिकाला मिळालेला हा राज्यस्तरीय सन्मान अवघ्या पंचक्रोशीतील युवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# डाऊच बुद्रुकमध्ये गावाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांचे वृक्षारोपण

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव तालुक्यातील डाऊच बुद्रुक येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' या संकल्पनेनुसार २ ऑक्टोबर महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत सेवा पंधरवडा तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपातळीवर विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. या कार्यक्रमानिमित्त विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच दिनेश गायकवाड होते. यावेळी माजी सरपंच धर्मा दहे, सुशांत घोडके, मनसुख दहे, आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य, तलाठी भगवान मधे, स्वाती ढमाले, संजय ढमाले, ग्रामसेवक व्ही. एम. पाटील, मुख्याध्यापिका गवळी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सरपंच दिनेश गायकवाड म्हणाले, ''केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना व उपक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापक लोकसहभाग आवश्यक आहे. ग्रामस्थांनी मनावर घेतल्यास गावाला विकासाच्या उंचीवर नेणे शक्य आहे.'' त्यांनी सार्वजनिक स्वच्छता, प्लास्टिक निर्मूलन, आयुर्वेदिक वनस्पती लागवड, जलसाठे व जलशुद्धीकरण तपासणी, शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची तपासणी यांसारख्या विषयांवर सातत्याने काम करण्याचे आवाहन केले. तलाठी भगवान मधे यांनी सेवा पंधरवड्याअंतर्गत गावातील रस्ते मोकळे करणे, भोगवटादारांची दोन जमिनी एक करणे तसेच महसूल विभागाशी संबंधित विविध बाबींवर मार्गदर्शन केले. ग्रामसेवक व्ही. एम. पाटील यांनी ग्रामसभेच्या विषयपत्रिकेवरील मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती उपस्थितांना दिली. डाऊच बुद्रुक गाव यापूर्वी अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरवले गेले असून, येत्या काळात देशपातळीवरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी ग्रामस्थांनी व्यापक लोकसहभागाचा संकल्प केला आहे.






# सकल मातंग समाजाचा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा

## सराईत गुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाईची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

श्रीरामपूर शहरात मातंग समाजातील तीन तरुणांवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने समाजबांधवांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले.

या निवेदनात हल्लेखोर सराईत गुंडांना तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, मातंग समाजातील निष्पाप युवक साई साळवे, रुद्र जगधने व भोलू गुप्ता यांच्यावर मुस्लिम समाजातील सराईत गुंड साहिल सय्यद व शाहिद सय्यद यांनी धारदार शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात तिन्ही युवक गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडले. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही या सराईत गुंडांविरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती; मात्र श्रीरामपूर पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई न केल्याने आरोपींचा धीर वाढला आणि त्यांनी हा गंभीर गुन्हा केला, असा आरोप निवेदनात करण्यात आला. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, अशी ठाम मागणी या मोर्चातून करण्यात आली. या मोर्चात अंकुश मोहिते, सुनील उमाप, चंद्रकांत काळाखे, नामदेव चांदणे, संजय चांदणे, जय भोसले, पप्पू पाटील, राम वडागळे, राम काते, पोपटराव पाथरे, प्रकाश वाघमारे, दिपक पाचारणे, लहु खंडागळे, सनी लोखंडे, सुनिल सकट, आकाश भोसले, अशोक भोसले, यशोदास वाघमारे, सागर साठे, नितीन खंडारे, दीपक सरोदे, हिना उबाळे, विलास ससाने, सागर उबाळे, रोहित जोशी, स्वप्निल साळवे, सुनील ढोले, राहुल ठोकळ यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

# श्रीरामपूर नगरपरिषदेला नमो उद्यानसाठी १ कोटी; ऑक्सिजन पार्कचे स्वप्न साकार

## लोकांच्या ३९४ कोटी रूपयांत उद्यान नामकरण सोहळा?

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राज्यातील नगरपालिका असलेल्या सर्व शहरात नमो उद्यान नावाने उद्यान विकसित करण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. श्रीरामपूर नगरपरिषदेलाही हा निधी मिळणार आहे. यामुळे शहरातील नागरिकांचे ऑक्सिजन पार्कचे स्वप्न साकार होईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबरला राज्य सरकारने यासंबधीचा शासननिर्णय प्रसिद्ध केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील नगरपालिका असलेल्या सर्व शहरांमध्ये श्रीरामपूर नगरपालिकेचाही समावेश आहे. यासर्व उद्यानांची स्पर्धाही होणार आहे. प्रथम क्रमांक ५ कोटी, द्वितीय ३ कोटी तर तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या नगरपालिकेला २ कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. राज्यात ३९४ ठिकाणी ही उद्याने होणार असून त्यासाठी ३९४ कोटी रुपयांचा निधी नगरविकास खात्याने मंजूर केला.

**कोणत्याही उद्यानाला नाव देण्याचा हक्क हा स्थानिक रहिवासी लोकांचा असतो, त्यावर सरकारने कुरघोडी करून बळजबरीने नमो उद्यान नाव दिल्याने राज्यातील नागरिकांचा हा हक्क डावलला गेला. या जीआरमधील नमो उद्यान नाव देण्याची बाब रद्द करण्याची अनेक सुजाण नागरिकांनी मागणी केली आहे.**

**यामुळे जिल्ह्यातील अनेक गायब केलेल्या ओपनस्पेस उघड होऊ शकतात. लेआऊट मंजूर करताना जी कायदेशिर ओपनस्पेस सोडावी लागते ती भ्रष्ट अधिकारी व बिल्डरलॉबीच्या संगनमताने फक्त मंजूर लेआऊटवरच सोडली जाते प्रत्यक्षात ती जागेवर नसतेच. नागरिकांनी आपल्या लेआऊटवरील ओपनस्पेस आहे का हे पहावे, नसेल तर जिल्हाधिकारी किंवा आपले सरकार पोर्टलवर तक्रार दाखल करावयात.**

वाढती लोकसंख्या आणि दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या उपनगरांची संख्या तसेच निधी नसल्यामुळे नागरिकांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांची ही फिरण्यासाठी मोठी कुचंबना होत होती. नगरपालिकांनी शहर तसेच उपनगरात अनेक ठिकाणी ओपनस्पेस निर्माण केल्या असल्या तरी त्याची आजही अवस्था अतिशय दयनीय आहे. नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना आजही शहरात ऑक्सिजन पार्क नसल्यामुळे त्यांच्या जीवनशैलीवर त्याचा परिणाम झाला आहे.

शहरात काही ठिकाणी उद्याने आहेत मात्र त्यांची अवस्था असून अडचण आणि नसून खोळंबा अशी झाली आहे. देखभाल दुरुस्ती नसल्यामुळे पालिकेच्या फक्त नकाशावर ही उद्याने आहेत. दरम्यान, या व अशा इतर अनेक समस्याचा सामना करीत असलेल्या नागरिकांना विरंगुळा म्हणून चांगले उद्यान मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

# बेशिस्तीमुळे अपघातात वाढ

भारतात होणाऱ्या रस्ते अपघाताबाबत काही दिवसांपूर्वी एक अहवाल प्रसिद्ध झाला. भारतातील रस्ते अपघात २०२३ या नावाने प्रसिद्ध झालेला हा अहवाल जितका धक्कादायक आहे तितकाच तो चिंताजनकही आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वात जास्त अपघात भारतात होतात असे नमूद करण्यात आले आहेत. या अहवालानुसार २०२३ या कॅलेंडर वर्षात देशात ४.८० लाख रस्ते अपघात झाले असून त्यात २.८ लाख लोकांना आपला जीव गमवावा लागला. त्यात दोन तृतीयांश लोक १८ ते ३५ या वयोगतील होते. ही गोष्ट अधिक गंभीर आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत त्यांचे असे अकाली मृत्यू क्लेशदायक आहेत. ऐन उमेदीच्या काळात असे हकनाक मरण यावे लागणे हे केवळ दुःखदायकच नाही तर देशातील रस्त्यांच्या सुरक्षेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. भारतात दिवसाला सरासरी पाचशे अपघात होतात आणि त्यात दरवर्षी लाखो लोक मरण पावतात. भारतात सर्वात जास्त मृत्यू हे रस्ते अपघातात होतात. अमेरिकेनंतर सर्वात जास्त रस्त्यांचे जाळे भारतात आहे. वाहनांची सख्या तर बेसुमार आहे. दरवर्षी त्यात लाखो वाहनांची भर पडते. वाहनांची वाढती संख्या देखील अपघातास कारणीभूत ठरत आहे. भारतातील रस्ते हा तर मोठा विनोदाचा विषय आहे. भारतातील रस्त्याचे जाळे वाढत आहे ही समाधानाची बाब असली तरी आपल्याकडील रस्ते बांधणी सदोष असल्याने अपघात होतात असेही काही जणांचे मत आहे काही वर्षापूर्वी तसा अहवालच आला होता तरीदेखील त्यात सुधारणा होत नाही.



रस्ते मग ते महामार्गावरील असोत की ग्रामीण भागातील सर्वच रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असते. खड्ड्यांमुळे सर्वाधिक अपघात होतात असे मानले जाते. आपल्याकडे रस्त्याच्या तुलनेत वाहनांची संख्याही प्रचंड वाढली आहे. नागरिकांचा सार्वजनिक वाहन व्यवस्थेवर विश्वास नसल्याने जो तो स्वतः च्या खाजगी वाहनांनी प्रवास करतो. वाहनांची सख्या वाढल्याने वाहतूक कोंडी देखील वाढली. महामार्ग असोत की पुण्यामुंबई सारखे मोठे शहरे असोत सर्वत्र रस्त्यांवर वाहनांच्या प्रचंड रांगा लागलेल्या दिसतात. ज्याला त्याला पुढे जायची घाई झालेली असते त्यामुळे वाहतुकीचे नियम न पाळताच गाड्या चालवणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे त्यातूनही अपघात होतात. वाढत्या वाहतुकीला नियंत्रित करणाऱ्या वाहतूक पोलिसांची संख्या देखील अपुरी आहे. याबाबत शासन दरबारी गंभीर विचार झाला पाहिजे. बहुतांशी अपघात हे मानवी चुकांमुळेच होतात याला कारण आहे वाहन चालकांचा बेशिस्तपणा. वाहन चालक बेजबाबदारपणे वाहन चालवून स्वतःसोबत दुसऱ्यांचा जीवही धोक्यात घालतात. भरधाव वेगात वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, मद्यपान करून वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, वाहतुकीचे नियम न पाळणे या गोष्टी आपल्याकडे सरास होतात. या गोष्टी वाहन चालकांनी टाळल्या तर अपघातांची संख्या निश्चित घटेल. रस्ते अपघातांची संख्या टाळण्यासाठी शासनानेही ठोस धोरण आखले पाहिजे. रस्त्यांवर बेपर्वाईने वाहन चालवणाऱ्यांना कडक शिक्षा करायला हवी. शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे देखील याबाबत प्रबोधन केले पाहिजे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**




# भाषा मानवी जीवन समृद्ध करतात- डॉ. श्रीपाल सबनीस

**सातारा । प्रदीप गांधलीकर**

संवादाचे माध्यम असलेल्या भाषा मानवी जीवन समृद्ध करतात. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते; भाषाभगिनी आपल्या साहचर्यातून मानवी जीवनाला समृद्धीचे आयाम देतात, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथे लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी यांच्या वतीने आयोजित पाली परिसंवादात ते अध्यक्षीय भाषण करत होते. यावेळी स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, पाली भाषा अभ्यासक ॲड. डॉ. सुगंध वाघमारे, लेखिका ललिता सबनीस, मनीषा भोसले, प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. सबनीस पुढे म्हणाले, सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी भारतभूमीत जन्मलेल्या पाली भाषेच्या अभ्यासातून आजही ज्ञानाचे नवे क्षितिज खुलते. येत्या १७ सप्टेंबर रोजी पाली भाषादिन आहे. या निमित्ताने आयोजित परिसंवादात विविध विद्वानांनी अभ्यासपूर्ण मते मांडून भाषेच्या संवर्धनाला नवी दिशा दिली आहे. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान गेल्या वर्षभरापासून पाली भाषेच्या जतन-संवर्धनासाठी सातत्याने उपक्रम राबवत आहे, ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. कार्यक्रमात महेंद्र भारती यांनी प्रास्ताविकातून प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. निरंजन फरांदे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. डॉ. कांचन नलावडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात पुरुषोत्तम सदाफुले, प्रा. डॉ. जयश्री बाबर, प्रा. डॉ. जयश्री आफळे, प्रा. डॉ. गजानन भोसले, प्रा. डॉ. सर्जेराव पवार, अरुण गराडे, प्रभाकर वाघोले, रवींद्र भारती, राजेंद्र वाघ, निमिष भारती, प्रकाश कांबळे, विजय कांबळे, अप्पा देशमुख, आनंदा कांबळे, सचिन कांबळे, आर. के. कांबळे यांनी सहकार्य केले.

# चास शिवारातील अपघातात केडगावच्या तरुणाचा मृत्यू

**अहमदनगर । रयत समाचार**



केडगाव शाहूनगर येथील १९ वर्षीय देवा सागर जेदिया याचा चास शिवारात झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. देवा हा निमगाव वाघा रोडवरील सौ. सुंदरबाई माणिकराव अडसुळ पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता. अकाली निधनाने कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे. त्याच्या पश्चात आई-वडील, बहिण तसेच चुलते-चुलती असा परिवार आहे. पुणे डेक्कन येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये देवाचे अवयवदान करण्यात आले असून, त्याच्या या मानवतावादी कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नगर-मनमाडची बाह्यवळण वाहतूक बंद करा; अन्यथा रस्ता रोको

## सोमनाथ कराळे यांचा इशारा

**नेवासा । विजय खंडागळे**



अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्यानगर-मनमाड या मार्गावरील वाहतुकीची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून या रस्त्यावर वारंवार अपघात घडत आहेत. गेल्या काही महिन्यांत साडेसाती हाटेना परिसरात अनेक नागरिकांचा जीव या अपघातांत गेला आहे. तरीही शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर कांगोणी ग्रामपंचायतीचे सरपंच सोमनाथ कराळे यांनी घोडेगाव चौफुलीवर तीव्र आंदोलन करून रस्ता रोको करण्याचा इशारा दिला आहे. कराळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर मार्ग आणि अहिल्यानगर-मनमाड मार्ग या दोन्ही रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून पायी चालणेही कठीण झाले आहे. मोठ्या वाहनांना मार्ग काढणे अवघड झाले असून रोजचे अपघात सुरूच आहेत. नगर-मनमाड हायवेवरील वाहतूक छत्रपती संभाजीनगरमार्गे वळविण्यात आल्याने या मार्गावरील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अपघातांची मालिका सुरू असून अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. कराळे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ''दोन दिवसांत नगर-मनमाड हायवेची वळवलेली वाहतूक थांबवून रस्त्याची डागडुजी व दुरुस्तीची ठोस पावले उचलली नाहीत, तर घोडेगाव चौफुल्यावर तीव्र आंदोलन करून रस्ता रोको करण्यात येईल.'' या आंदोलनात सरपंच कराळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचेही सांगण्यात आले.

# बेलापुरात २१ रोजी मिनी मॅरेथॉन स्पर्धा

## लोकनेते मुरकुटेंचा वाढदिवस होणार जल्लोशात साजरा

**बेलापूर । शफीक बागवान**

लोकनेते माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या वाढदिवसानिमित्त हरिहर फाउंडेशन बेलापूर यांच्यावतीने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हरिहर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विक्रम नाईक यांनी दिली. अधिक माहिती देताना नाईक म्हणाले, रविवारी ता. २१ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजता या स्पर्धेचा आरंभ करण्यात येणार आहे. स्पर्धेचा मार्ग : बेलापूरश्रीरामपूर रस्ता झेंडा चौक, अजय विजय सर्विस स्टेशन पुन्हा झेंडा चौक असा असणार आहे. सर्व वयोगटातील पुरुषांसाठी ही स्पर्धा खुली आहे. स्पर्धेत सहभाग घेणाऱ्यांसाठी प्रवेश शुल्क फक्त २१ रुपये ठेवण्यात आले आहे. स्पर्धेतील प्रथम विजेत्यास पारितोषिक आणि ५१०० रुपये. द्वितीय - ३१००/-. तृतीय - २१००/- असे जाहीर करण्यात आले आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन हरिहर फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी केले. स्पर्धेत भाग घेऊन इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी ऋषीराज मोबाईल शॉपी मार्केटयार्ड गेटसमोर, बेलापूर बु।। ९८८१८१८२२८, ९१३०३३२२७४ या ठिकाणी तसेच गोविंद ड्रायक्लीनर्सबँक ऑफ महाराष्ट्रजवळ बेलापूर गोविंद गाडेकर- ७७७६८२०३८० येथे नाव नोंदणी करावी, असेही आवाहन हरिअर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# सहदेव तांबे यांचे निधन

**मुंबई । रयत समाचार**



कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील कुपवडे गावचे सुपुत्र, ज्येष्ठ पत्रकार, लेखक, चित्रकार आणि सामाजिक कार्यकर्ता सहदेव शिवा तांबे यांचे निधन झाले. बहुगुणी, जिद्दी आणि समाजहितासाठी सदैव तत्पर राहिलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेले आहे. कुपवडेसारख्या छोट्या गावातून शिक्षण घेऊन त्यांनी मुंबईत स्थायिक होत मुंबई पोर्ट ट्रस्ट हॉस्पिटलमध्ये सेवेत प्रवेश केला. पत्रकार तांबे म्हणून त्यांनी हॉस्पिटलपासून ते युनियनपर्यंत, वृत्तपत्र लेखक संघापासून ते कला-सांस्कृतिक मंडळापर्यंत एक वेगळी छाप सोडली. सेवेत असतानाही त्यांनी रुग्ण, कामगार आणि सामाजिक कार्यासाठी आपले जीवन समर्पित केले. पत्रकार तांबे यांनी महाराष्ट्रातील असंख्य मासिके, वार्तापत्रे आणि दैनिकांमधून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे लेखन केले. त्यांच्या लेखनामुळेच मुंबई सीएसटी येथील भुयारी मार्गाची आवश्यकता ही मागणी प्रत्यक्षात येऊन सध्याच्या सबवेच्या रूपात आकारास आली. त्याचप्रमाणे रायगडातील पुलाची उंची वाढविणे, सायन हॉस्पिटलमधील सुविधा, धोकादायक पूल पुनर्विकास, रेल्वे गाड्या व बस फेऱ्यांची वाढ यांसारख्या अनेक विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन आणि पाठपुरावा केला. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाला राज्यस्तरीय ''कोकणरत्न'', ''समाजरत्न'', ''कलाभूषण'', ''रायगडरत्न'' अशा मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पत्रकारिता, साहित्य, कला व सामाजिक कार्य या सर्व क्षेत्रांमध्ये अष्टपैलू ठसा उमटवणारे सहदेव तांबे यांचे कार्य आणि स्मृती समाजाच्या मनात कायम राहतील.



# मुलींच्या कुस्तीला सोनईत दणदणीत प्रतिसाद

## १६ संघांचा सहभाग, विजेत्यांना आंतरविभागीय स्पर्धेत संधी


**सोनई । विजय खंडागळे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अहमदनगर क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुळा एज्युकेशन सोसायटीच्या प्रेरणेने सोनई येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आंतरमहाविद्यालय कुस्ती मुली क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर क्रीडा विभागाचे सचिव डॉ. राजेंद्र देवकाते उपस्थित होते. उद्घाटनावेळी प्राचार्य कल्हापुरे म्हणाले, मुलींनी सर्वच क्षेत्रात आपली वेगळी छाप सोडली आहे. कुस्ती सारख्या पारंपरिक खेळात मुलींचा शिरकाव हा अभिमानाचा विषय आहे. जिल्ह्यातील तब्बल १६ संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विजेत्या खेळाडूंची आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणार असून त्या २५ व २६ सप्टेंबर रोजी मुगुटराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर येथे रंगणार आहेत. स्पर्धेसाठी मुळा एज्युकेशन सोसायटीचे सचिव माननीय उत्तमराव लोंढे व सहसचिव माननीय विनायक देशमुख यांनी सर्व संघांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र खंदारे यांनी केले. आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव झिने यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. तुकाराम जाधव यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. गोविंद वर्पे, डॉ. भीमराज सोनवणे, एनसीसी कॅप्टन डॉ. सुरेश जाधव, डॉ. अविनाश साळवे, डॉ. योगेश साळवे, प्रा. महेश जंगले, शिरसाट भाऊसाहेब आदी मान्यवर उपस्थित होते. इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र खंदारे यांनी केले असून नियोजन श्री. दीपक सोनावणे यांनी पाहिले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घोटणचे शिवलिंग जलमय

# अतिवृष्टीने शेतीचे मोठे नुकसान, शेतकरी हवालदिल

**घोटण । शिवाजी घुगे**



शेवगाव तालुक्यातील घोटण गावातील पुरातन श्रीमल्लिकार्जुन महादेव मंदिरातील शिवलिंग मुसळधार पावसामुळे पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. मंदिरालगतच्या नदीला आलेल्या पूरामुळे शेजारील जुनी बारव वाहून भरली असून, गाभाऱ्यातील शिवलिंग दर्शनार्थींना पाण्यातूनच दर्शन घ्यावे लागत आहे. मंदिरातील पुजारी शिंदे यांनी सांगितले, सन २००६ मध्येही अशाच प्रकारे अतिवृष्टीमुळे शिवलिंग पूर्णपणे पाण्यात बुडाले होते. निसर्गरम्य परिसरात वसलेले हे ऐतिहासिक मंदिर सध्या पूर्णपणे जलमय अवस्थेत आहे. हे ऐतिहासिक मंदिर असून यातील गधेगाळ इतिहास अभ्यासकांमधे प्रसिद्ध आहे. हि गधेगाळ पुर्वी गावातील एका चौकात होती, ती अनेक वर्षांपूर्वी येथे आणून ठेवली आहे. अतिवृष्टीमुळे घोटणसह परिसरातील रस्ते वाहून गेले असून, ८० ते ९० टक्के शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शेतकरीवर्ग अक्षरशः हवालदिल झाला असून, शासनाने तत्काळ मदतीचा हात द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, गावकऱ्यांनी श्रीमल्लिकार्जुन ईश्वराच्या चरणी प्रार्थना करून शेतकरी पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला.

# पडळकर एकटा नसून महाराष्ट्रात उद्धवू पाहणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीचा तो एक भाग- अरुण कडू पाटील

## खालच्या दर्जाच्या वक्तव्याचा जाहीर निषेध

**राहुरी । रयत समाचार**



पडळकर नावाच्या व्यक्तीने काल माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंतदादा पाटील यांच्या विषयी खालच्या दर्जाचे वक्तव्य केले. या वक्तव्याचा मी व माझ्या सहकाऱ्यांसह जाहीर निषेध व्यक्त करीत आहे, अशी ठाम भूमिका रयत शिक्षण संस्थेचे अरुण पुंजाजी कडू पाटील यांनी स्पष्ट केली.

कडू पाटील यांनी म्हटले की, पडळकर हा एकटा नसून महाराष्ट्रात उद्धवू पाहणाऱ्या एका दुष्ट प्रवृत्तीचा तो एक भाग आहे. सूर्यावर थुंकून स्वतः ला विशेष भासवण्याचा त्याचा प्रयत्न हा निंदनीय असून समाजाने त्याकडे दुर्लक्ष करणे अशक्य आहे. अशा प्रवृत्तीच्या मागे कोणतीही जात उभी राहत नाही, हे स्पष्टपणे लक्षात घ्यायला हवे. त्यांनी पुढे सांगितले, अशा प्रवृत्तींना सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक पुढे केले आहे. मात्र त्यांचा बंदोबस्त करणे अवघड नाही. सभ्य समाजाने गप्प बसणे हा पर्याय राहिलेला नाही, अशा वक्तव्यांचा जाहीर निषेध होणं गरजेचं आहे, असे कडू यांनी ठासून सांगितले. दरम्यान, राहुरी येथे माजी मंत्री प्राजक्तदादा तनपुरे यांनी या निषेधासाठी बैठक आयोजित केली असून, या बैठकीस मी वैद्यकीय कारणामुळे उपस्थित राहू शकत नसले तरी निषेधाच्या बाबतीत मी कुठेही कमी पडणार नाही, असा जाहीर पाठिंबा कडू यांनी नोंदवला आहे. पडळकरांसारख्या व्यक्तींच्या भ्याड वक्तव्याला समाजातून जोरदार विरोध झाला पाहिजे, असे मत अरुण पुंजाजी कडू यांनी व्यक्त केले.